**दिनांक १७.०२.२०२२ रोजीचे सर्वसाधारण सभेत पारित करण्यात आलेला तसेच त्याच सभेत कायम करण्यात आलेल्या ठरावाचा उतारा**

**(प्रशासकीय विषय)**

**विषय क्रमांक १७ :-** मौजा बडनेरा सर्व्हे क्र. ३३७/३अ, बिन्नानी लेआऊट या अभिन्यासा मधील सार्वजनिक वापराची जागा अध्यक्ष,सरस्वती बहुउद्देशिय शिक्षण संस्था संचालित सरस्वती इन्स्टीट्युट ऑफ नर्सिंग ॲड रिसर्च, अमरावती यांना मैदान/बगीचा विकसीत करणे करीता व व्यवस्थे करीता देण्या बाबत.

**ठराव क्रमांक १७ :-** मौजा बडनेरा सर्व्हे क्र. ३३७/३अ, बिन्नानी लेआऊट या जागेचा अभिन्यास महानगरपालिके कडुन पत्र क्र.१९० दि.१९/१२/१९९७ अन्वये मंजुर आहे. त्या मधील सार्वजनिक वापराची १९३४.२५चौ.मी. जागा मनपा कडे निहीत आहे. सदर सार्वजनिक वापराची जागा अध्यक्ष,सरस्वती बहुउद्देशिय शिक्षण संस्था संचालित सरस्वती इन्स्टीट्युट ऑफ नर्सिंग ॲड रिसर्च, (रजि.नं.एम.एच.६३९/०८/एफ/१६०६६/अम) अमरावती यांनी मैदान/बगीचा विकसीतकरणे करीता दि.२५/१/२०१९रोजीचे पत्रा नुसार मागणी केलेली आहे.सदर परवानगी बाबत स्थानिक नागरिकांच्या हरकती संबंधात जाहीरसुचना दै.जनमाध्यम व दै.अपना महाविदर्भ अमरावती मध्ये दि.१८/१२/२०२१ ला प्रसिध्द करण्यात आलेली आहे विहित मुदतीस कुठलीही हरकत प्राप्त झालेली नाही.

मंजुर एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (U.D.C.P.R.)-२०२० मधील नियम क्र.३.४.७ अन्वये सार्वजनिक वापराच्या जागे मध्ये मैदान /बगीचा इ. वापर अनुज्ञेय आहे. अमरावती महानगर पालिका क्षेत्रातील अभिन्यासा मधील सार्वजनिक वापराच्या जागा विकसीत करणे करीता व व्यवस्थे करीता आवेदक संस्थेस देण्या बाबतचे धोरण / ठराव सर्वसाधारण सभा ठराव क्र.०४ दि.१६/३/२०२१ अन्वये मंजुर आहे.या मधील निर्णय क्र.५:- दि.०३/१२/२०२० पुर्वी मंजुर झालेल्या अभिन्यासा मधील सार्वजनिक वापराच्या जागा महानगरपालिके कडे वर्ग झालेल्या असल्याने या जागा आवेदक संस्थेस व्यवस्थे करीता देण्याचे प्रावधान आहे. सदर मंजुर धोरणा नुसार सदर प्रकरणी खालील प्रमाणे छाननी करण्यात आलेली आहे.

१) सदर जागेवर मनपाने बगीचा अथवा क्रिडांगण विकसीत केलेले नाही.
२) आवेदक संस्थाने सन २०१९ व सन २०२० चे ऑडीट रिपोर्ट सादर केलेला आहे
३) आवेदक संस्थेस सदर जागा प्रथम ३ वर्षा करीता देण्यात येईल. ३ वर्षात विकास केल्यास पुढील १० वर्षा करीता मुदत वाढ देण्याचे प्रस्तावित आहे.
४) सदर अभिन्यासा भुखंडधारकांचे संमती पत्र (नोटरी) सादर केलेले आहे. तसेच संस्था याच परिसरातील असून याच परिसरात कार्यरत असल्या बाबतचे प्रतिज्ञापत्र सादर केलेले आहे.
५) या अभिन्यासा मध्ये एकुण ४० प्लॉट आहेत. त्या पैकी प्लॉट क्र.२२,२३,२४,२६,२७,२८व २९ या ७ प्लॉट वर अर्जदार संस्थेचे महाविद्याल व वसतिगृह आहे. उर्वरित ३३ प्लॉट मध्ये बांधकाम करण्यात आलेले नाही व नागरिक राहण्या करीता आले नाही.
६) संबंधीत प्रभाग क्र. २१ मधील सन्मा. नगर सेवक मो.साबीर शे. नासिर, शेख मो. इमरान व सन्मा नगर सेविका सौ. गंगा र. अंभोरे (भैसने) यांनी संमती पत्र दिलेले आहे.

मंजुर धोराणा मधील अट क्र.५/८ वगळता इतर बाबतीत प्रकरण मंजुर धोरणा प्रमाणे अनुज्ञेय असल्याने विषयांकीत सार्व. वापराची जागा अर्जदार

संस्थेस मैदान/बगीचा विकसीत करणे करीता व व्यवस्थे करीता खालील अटिंवर देण्याचे प्रस्तावित आहे.

१) विषयांकीत जागेचा अधिकृत ताबा महानगरपालिकेचाच राहील, फक्त मैदान/बगीचा विकसीत करणे व देखरेख (व्यवस्थापन) अर्जदार संस्थेने करावी.

२) अभिन्यासामधील भुखंड धारकांना मैदान/बगीचा वापर करण्यास मज्जाव करता येणार नाही. दररोज मैदान/बगीचा नागरिकांकरीता खुले ठेवावे लागेल.

३) मैदान/बगीचा विकसीत करणे जसे तार फेसींग करणे, कंपाऊड भिंत बांधणे लेव्हलींग करणे, वृक्ष लावणे खेळण्याचे साहित्य लावणे व त्याचे जतन करणे इत्यादी स्वरुपाची कामे मनपाची पुर्व परवानगी घेवुन अर्जदार संस्थेने स्वत:च्या खर्चाने करावे लागेल.

४) सदर्हु मैदान/बगीचा सार्वजनिक राहील त्या मध्ये जातपात, धर्म,पंथ याचा भेदभाव केला जाणार नाही.

५) प्रस्तावित जागेवर विकासाची कामे पुर्ण करण्याची जबाबदारी अर्जदार संस्थेची राहील.

६) महानगरपालिका अमरावती कोणत्याही विकास कामा करीता फंड उपलब्ध करुन देणार नाही.

७) सदर मैदान/बगीचा खालील जागेची आवश्यकता मनपास तथा शासनाला असल्यास जागा रिक्तकरुन द्यावी.

८) भविष्यात अभिन्यासामधिल भुखंडधारकांचे आक्षेप/ तक्रार प्राप्त झाल्यास कोणतेही कारण न देता, देखभालीसाठी दिलेली जागा परत घेण्याचे सर्व अधिकार महानगरपालिकेस राहिल.

९) भुखंडधारकाची संस्था स्थापीत झाल्यास व त्यांची मागणी असल्यास सदर जागा भुखंडधारकांच्या संस्थेच्या ताब्यात देण्यात येईल. या बाबत अर्जदार संस्थेस कुठलाही विरोध करता येणार नाही किंवा नुकसान भरपाई मागता येणार नाही.

उक्त प्रस्तावास सर्वसाधारण सभेची मंजुरी घेणेबाबत मा.आयुक्त यांनी दि.१६/०२/२०२२ ला प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे. सबब विषयांकीत प्रशासकीय विषयास सर्वसाधारण सभे मार्फत सर्वानुमते मंजुरी प्रदान करणे करीता सादर करण्यात आला आहे. सदर्हु प्रशासकीय विषयास ही सभा सर्वानुमते मंजुरी प्रदान करीत असून ठराव याच सभेत कायम करण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर व कायम

**स्वा/-**
**नगरसचिव,**
**महानगरपालिका, अमरावती.**

**स्वा/-**
**सभापती तथा महापौर,**
**महानगरपालिका, अमरावती**

नगरसचिव
महानगरपालिका, अमरावती.